(7)

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

ज्ञानगंगा घरोघरी

## व्यवस्थापन मंडळ बैठक

# कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| बैठक क्रमांक | : | 156 |
| स्थळ | : | विद्यापीठ प्रशासकीय इमारत - सभागृह<br>यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ<br>नाशिक, 422222 |
| वार व दिनांक | : | शनिवार, दिनांक : 25 जून 2016 |
| वेळ | : | सकाळी 11.30 |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

# कार्यवृत्त

156 वी, व्यवस्थापन मंडळ बैठक, शनिवार, दिनांक 25 जून, 2016 रोजी सकाळी 11.30 वाजता, विद्यापीठ प्रशासकीय इमारत - सभागृह, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. प्रा. डॉ. माणिकराव साळुंखे, कुलगुरु, | अध्यक्ष |
| 2. | मा. श्री. ज्ञानदेव नाठे, संचालक,तंत्रशिक्षण, यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| 3. | मा. डॉ. डब्ल्यु. एन.गाडे, कुलगुरु, पुणे | सदस्य |
| 4. | मा. डॉ. बंदी व्यंकटेशवारलू, कुलगुरु, परभणी | सदस्य |
| 5. | मा. श्री. उल्हास एन. गवळी, औरंगाबाद | सदस्य |
| 6. | मा. प्रमोद बियाणी, संचालक, शैक्षणिक सेवा विभाग | सदस्य |
| 7. | मा. श्री.हेमंत टकले, मुंबई | सदस्य |
| 8. | मा. डॉ. आर.सेशा अय्यर, मुंबई | सदस्य |
| 9. | मा. डॉ. एस.ए. ठोंबरे. औरंगाबाद | सदस्य |
| 10. | मा. प्रा. कपिल कुमार, नवी दिल्ली | सदस्य |
| 11. | डॉ. प्रकाश अतकरे, कुलसचिव | सचिव |

वित्त अधिकारी, वित्त विभाग आणि परीक्षा नियंत्रक, परीक्षा विभाग हे निमंत्रित म्हणून बैठकीस हजर होते.

**खालील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.**

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. सचिव,उच्च व तंत्रशिक्षण,मुंबई | सदस्य |
| 2. | मा. सचिव, उद्योग, मुंबई | सदस्य |
| 3. | मा. सचिव, कृषी, मुंबई | सदस्य |
| 4. | मा. श्री.वाकडे प्रफुल, संचालक, व्यावसायिक व प्रशिक्षण, यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| 5. | मा. संचालक,उच्च शिक्षण, पुणे | सदस्य |
| 6. | मा. डॉ. व्ही. एल. माहेश्वरी,जळगाव | सदस्य |
| 7. | मा. डॉ. विद्या येरावडेकर, पुणे | सदस्य |

| विषय क्रमांक | | तपशील |
|---|---|---|
| 156.1.0 | | **स्वागत**<br>मा. कुलसचिव यांनी उपस्थित सदस्यांचे स्वागत केले. व बैठकीस सुरवात करण्यात आली. |
| 156.2.0 | 156.2.1 | दि. 9 एप्रिल, 2016 रोजी झालेल्या 155 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीचे कार्यवृत्त वाचून त्यावर मा. कुलगुरू यांनी स्वाक्षरी करणे. (कार्यवृत्त पा.क्र. 1 ते 4)<br>**व्य.मं.ठरावः दि. 9 एप्रिल, 2016 झालेल्या 155 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीचे कार्यवृत्तांत वाचून कायम करुन त्यावर मा.कुलगुरु यांनी स्वाक्षरी केली** |
| | 156.2.2 | दि. 9 एप्रिल, 2016 रोजी रोजी झालेल्या 155 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल (अहवाल पा.क्र. 1)<br>**व्य.मं.ठरावः दि. 9 एप्रिल, 2016 झालेल्या 155 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत झालेल्या निर्णयावरील कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.** |
| | 156.2.3 | दि. 22 मार्च 2016 रोजी झालेल्या 154 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल (अहवाल पा.क्र. 1 ते 4) |

| | | |
|---|---|---|
| | | **व्य.मं.ठराव: दि. 22 मार्च 2016 झालेल्या 154 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत झालेल्या निर्णयावरील कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.** |
| 156.3.0 | | **कार्योत्तर मान्यतेचे विषय** |
| | 156.3.1 | Continuation of Recognition to Institutions for offering programmes through Open and Distance Learning mode for the academic year 2016-17 UGC, New Delhi A-Declartion Certificate on a duly notariced affdavit पाठविण्याबाबत.<br>(टिपणी - Continuation of Recognition to Institutions for offering programmes through Open and Distance Learning mode for the academic year 2016-17 नुसार विद्यापीठाने दि.23.4.2016 रोजी 135 अभ्यासक्रमासंदर्भात विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली येथे सन 2016-17 च्या शिक्षणक्रमांच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्ताव व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ सादर) (सहपत्र A)<br>**व्य.मं.ठराव:Continuation of Recognition to Institutions for offering programmes through Open and Distance Learning mode for the academic year 2016-17 UGC, New Delhi A-Declartion Certificate on a duly notariced affdavit पाठविण्याबाबत केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |
| 156.4.0 | | **सखोल चर्चेचे विषय** |
| | 156.4.1 | दि.23 जून 2016 रोजी मा.कुलसचिव या पदासाठी मुलाखत घेण्यात आली आहे निवड समितीचा गोपनीय अहवाल विचारार्थ सादर (सहपत्र वेळेवर सादर करण्यात येईल)<br>**व्य.मं.ठराव: निवड समितीच्या अहवालानुसार श्री. दिनेश मारोतराव भोंडे यांची कुलसचिव पदावर नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली.** |
| | 156.4.2 | दि.24 जून 2016 रोजी मा.वित्त अधिकारी या पदासाठी मुलाखत घेण्यात आली आहे निवड समितीचा गोपनीय अहवाल विचारार्थ सादर. (सहपत्र वेळेवर सादर करण्यात येईल)<br>**व्य.मं.ठराव: निवड समितीच्या अहवालानुसार योग्य उमेदवार उपलब्ध झाला नाही. निवड समितीचा अहवाल स्वीकारण्यात येउन त्यास मान्यता देण्यात आली.** |
| | 156.4.3 | विद्यापीठातील प्रशासकीय पदांमधील 'अ' गटाचे खातेंतर्गत पदोन्नती समिती अहवाल विचारार्थ सादर<br>(टिपणी - विद्यापीठातील प्रशासकीय पदांमधील 'अ'गटाचे पदोन्नतीसाठी खालीलप्रमाणे पदनिहाय पदे रिक्त होती. अ.क्र. पदाचे नाव पद संख्या प्रवर्गनिहाय विवरण<br>01 उपकुलसचिव 01 1 - Open<br>02 सहायक कुलसचिव 04 1-SC, 1-ST, 1-VJ-A, 1-Open<br>आरक्षण कक्षाने दि. 28.4.2016 रोजीच्या अंतर्गत संज्ञापन पत्रानुसार वरील रिक्त पदांचे प्रवर्गनिहाय पदोन्नतीसाठीचे आरक्षण कळविलेले आहे.<br>आस्थापना कक्षाचे दिनांक 25.4.2016 रोजीच्या अंतर्गत संज्ञापन पत्रानुसार वरील रिक्त पदांवर विद्यापीठातील पात्र उमेदवारांना पदोन्नती देण्यासाठी मा. कुलगुरूंनी दि. 25.4.2016 च्या अंतर्गत संज्ञापन पत्रानुसार खातेंतर्गत पदोन्नती समितीचे दिनांक 3.5.2016 रोजी आयोजन करण्यासाठी मान्यता दिलेली होती. दि. 27.4.2016 च्या अंतर्गत संज्ञापन पत्रानुसार श्री. टि.के.सोनवणे, सहायक कुलसचिव यांना सेवेत कायम करण्यासाठी 'अ' गटाच्या खातेंतर्गत पदोन्नती समितीची बैठक बोलविण्यास मान्यता दिली होती. तसेच श्री. सतिश मराठे,सहायक कुलसचिव, श्री. राजेंद्र तळेले, नेटवर्क इंजिनियर आणि डॉ. रमेश शेकोकार, सहायक संपादक यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देणेसाठी ही प्रकरणे दि.3.5.2016 रोजी खातेंतर्गत पदोन्नती समितीसमोर प्रकरण सादर करण्यास मा. कुलगुरूंनी मान्यता दिलेली होती. मात्र संबंधीत अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवाल प्राप्त नसल्याने ते प्राप्त झाल्यानंतर मा. कुलगुरूंच्या मान्यतेने दि. 3.5.2016 ऐवजी दि. 18.5.2016 रोजी दुपारी 3.00 मा. कुलगरूंच्या दालनात खातेंतर्गत पदोन्नती समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर समितीने (1) 'अ' गटातील अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्यासाठी केलेली शिफारस. (2) 'अ' गटातील अधिकाऱ्यांना सेवेत कायम करणेबाबत केलेली शिफारस. (3) 'अ' गटातील अधिकाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगते योजनेचा लाभ देण्याबाबत केलेली शिफारस यांचे गोपनीय पाकीट सोबत जोडले आहे.<br>यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या अध्यादेश क्रं. 18 (8 of 1993) मधील तरतुद क्रं. 17 अन्वये 'अ' गटाचे नियुक्ती अधिकारी व्यवस्थापन मंडळ असल्याने दिनांक 18.5.2016 च्या खातेंतर्गत पदोन्नती समितीने केलेल्या शिफारशी व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेसाठी सादर. (सोबत गोपनीय पाकीट) (सहपत्र वेळेवर सादर करण्यात येईल) |

| | | |
|---|---|---|
| | | **व्य.मं.ठराव: 'अ' गटातील अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्यासाठी केलेल्या शिफारशीनुसार**<br>**1. श्री.सतीश मराठे, सहायक कुलसचिव यांना उपकुलसचिव या पदावर पदोन्नती**<br>**2. श्री.पुरुषोत्तम कुलकर्णी, कक्ष अधिकारी यांना सहायक कुलसचिव या पदावर पदोन्नती**<br>**3. श्री. चंद्रकांत पवार,कक्ष अधिकारी यांना सहायक कुलसचिव या पदावर पदोन्नती**<br>**4. श्री. मधुकर धात्रक, कक्ष अधिकारी यांना सहायक कुलसचिव या पदावर पदोन्नती**<br>'अ' गटातील अधिकाऱ्यांना सेवेत कायम करणेबाबत केलेल्या शिफारशीनुसार —<br>श्री. तुळशिराम सोनवणे, सहायक कुलसचिव यांचा परीविक्षा कालावधी सहा महिन्यासाठी (3.10.2016) वाढविण्यास<br>'अ' गटातील अधिकाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगते योजनेचा लाभ देण्याबाबत केलेल्या शिफारशीनुसार<br>1. श्री.सतिश मराठे, सहायक कुलसचिव यांना 15.12.2015 पासून सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ<br>**2. श्री. राजेंद्र तळेले, नेटवर्क इंजिनियर यांना दि. 31.12.2013 पासून सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ**<br>**3. डॉ.रमेश शेकोकार, सहायक संपादक, दि.1.4.2009 ते 31.12.2009 या कालावधीत नांदेड येथे स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठात प्रपाठक या पदावर मुक्त विद्यापीठातील त्यांच्या ग्रहणाधिकार राखून रुजू झाले होते. प्रपाठक हे पद त्यांच्या सहायक संपादक या पदापेक्षा उच्च स्तराचे असल्याने तसेच या पदाचा लाभ सहायक संपादक या पदासाठी उपयोगाचा असल्याने 1.4.2009 ते 31.12.2009 हा सेवाखंड क्षमापित करुन सदर प्रकरण महाराष्ट्र शासनाकडे पाठवून त्यांचे उत्तर आल्यानंतर आश्वासित सेवा योजनेचा लाभ देण्यास, मान्यता देण्यात आली.** |
| | 156.4.4 | ओडीशा राज्य मुक्त विद्यापीठ, ओडीशा, यांचे दि. 29.3.2016 च्या पत्रानुसार, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या प्रमाणपत्र, पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवी तयार करण्यात आलेले अध्ययन साहित्य वापरण्याबाबतची बाब विचारार्थ सादर.<br>(टिपणी - ओडीशा राज्य मुक्त विद्यापीठ, येथील डॉ.श्रीकांत मोहपात्रा, विशेष कार्यकारी अधिकारी, यांचे दि. 29.3.2016 च्या पत्रानुसार यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या प्रमाणपत्र, पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवी यासाठी तयार करण्यात आलेल्या अध्ययन साहित्य ओडीशा राज्य मुक्त विद्यापीठास वापरण्याबाबत पत्र पाठविण्यात आले होते. यासंदर्भात दि.2.6.2016 रोजी आयोजित केलेल्या विद्यापीठाच्या संचालक बैठकीत सदरील विषय ठेवण्यात आला होता. यासंदर्भात ओडीशा राज्य मुक्त विद्यापीठास, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने तयार केलेले अध्ययन साहित्य वापरण्यास मान्यता द्यावी. सदर विषय व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ सादर.) (सहपत्र B)<br>**व्य.मं.ठराव: ओडीशा राज्य मुक्त विद्यापीठ, ओडीशा, यांचे दि. 29.3.2016 च्या पत्रानुसार, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या प्रमाणपत्र, पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवीसाठी तयार करण्यात आलेले अध्ययन साहित्य विद्यापीठाने वैबसाईटवर टाकलेले आहे. सदरील अध्ययन साहित्य 1 वर्षासाठी (सन 2016-17) विनामुल्य वापरण्यास तसेच सदरीर अध्ययन साहित्याचा वापर फक्त शैक्षणिक उपयोगासाठी करण्यात यावा. विद्यापीठाच्या नावाचा उल्लेख श्रेयनामावली (Credit Page) अध्ययन साहित्य विकसन करणारी संस्था म्हणून करावा या अटींवर मान्यता देण्यात आली.** |
| | 156.4.5 | औरंगाबाद विभागीय केंद्रावर स्पर्धा परीक्षेच्या अभ्यास करण्याऱ्या विद्यार्थ्यांसाठी, विद्यापीठाची अभ्यासिका सुरु करण्याबाबत व अभ्यासिकेत 50 विद्यार्थ्यांना प्रवेश देणे, प्रत्येक शैक्षणिक सत्रासाठी रु.500/- आकारण्याबाबतची बाब विचारार्थ सादर.<br>(टिपणी - विद्यापीठाच्या औरंगाबाद विभागीय केंद्राचे विभागीय संचालक, यांनी दि.27.5.2016 च्या पत्रानुसार औरंगाबाद विभागीय केंद्रावर स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाची अभ्यासिका सुरु करण्यात यावी व या अभ्यासिकेत 50 विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा व प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्येक शैक्षणिक सत्रासाठी रु. 500/- आकारण्यात यावे. या संदर्भातील विषय 2.3.2016 रोजी आयोजित केलेल्या विद्यापीठाच्या संचालक वैठकीत सदर विषय ठेवण्यात आला होता यास मान्यता |

| | | |
|---|---|---|
| | | देण्यात आली. व सदरीर प्रस्ताव वित्त समिती व व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत ठेवण्यात यावा. असे ठरले. त्यानुसार सदर प्रस्तावास वित्त समितीच्या वतीने मान्यता देऊन सदरी प्रस्ताव व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ सादर) (सहपत्र C)<br>**व्य.मं.ठराव: औरंगाबाद विभागीय केंद्रावर स्पर्धा परीक्षेच्या अभ्यास करण्याऱ्या विद्यार्थ्यांसाठी, विद्यापीठाची अभ्यासिका सुरु करण्याबाबत व अभ्यासिकेत 50 विद्यार्थ्यांना प्रवेश देणे, प्रत्येक शैक्षणिक सत्रासाठी रु.500/- आकारण्याबाबत मान्यता देण्यात आली.** |
| | 156.4.6 | विविध शिक्षणक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी प्रवेश रद्द केल्यास त्यांना प्रवेश शुल्क परत करावे लागते यासाठी युजीसी, नवी दिल्ली यांनी निर्देशित केल्याप्रमाणे सूचना अवलंब करण्याबाबत. (सहपत्र D<br>**व्य.मं.ठराव: विविध शिक्षणक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी प्रवेश रद्द केल्यास त्यांना प्रवेश शुल्क परत करावे लागते यासाठी युजीसी, नवी दिल्ली, यांच्या दिनांक 23 एप्रिल 2007 च्या पब्लिक नोटीसीनुसार कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आली.** |
| | 156.4.7 | 30 वी एशियन असोशिएशन ऑफ ओपन युनिर्व्हसिटी, फिलपाईन्स येथे वार्षिक सभा आयोजित करण्यात आली आहे या सभेस मा,कुलगुरु उपस्थित राहणार असून त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रु.150000/- खर्चाची बाब विचारार्थ<br>(टिपणी - दिनांक 26 ते 29 ऑक्टोबर 2016 दरम्यान 30 वी एशियन असोशिएशन ऑफ ओपन युनिर्व्हसिटी यांनी वार्षिक सभा फिलपाईन्स येथे आयोजित केलेली आहे. सदर सभेसाठी मा.कुलगुरु उपस्थित राहणास असून, त्यासाठी नोंदणी शुल्क, विमान प्रवास व राहण्याची व्यवस्था इत्यादीसाठी अंदाजे 1,50,000/- खर्च अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे सन 2018 मध्ये एशियन असोशिएशन ऑफ ओपन युनिर्व्हसिटीची वार्षिक सभा यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे आयोजित करण्यासाठीचा प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी फिलिपाईन्स येथे उपस्थित राहणे आवश्यक आहे. व्यवस्थापन मंडळाने एशियन असोशिएशन ओपन ऑफ युनिर्व्हिसिटीची वार्षिक सभा 2018 मध्ये घेण्यास संमती दिलेली आहे. तरी सदर एशियन असोशिएशन ऑफ ओपन युनिर्व्हसिटीच्या फिलिपाईन्स येथे 26 ते 29 ऑक्टोबर 2016 दरम्यान होणाऱ्या वार्षिक सभेस उपस्थित राहण्यास व त्यासाठी लागणारा खर्च व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ सादर) (सहपत्र नाही)<br>**व्य.मं.ठराव: 30 वी एशियन असोशिएशन ऑफ ओपन युनिर्व्हसिटी, फिलपाईन्स येथे वार्षिक सभा आयोजित करण्यात आली आहे या सभेस मा.कुलगुरु उपस्थित राहण्यास व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रु.150000/- खर्चास मान्यता देण्यात आली.** |
| | 156.4.8<br>व्य.मं.बैठक<br>155.4.1<br>9.4.2016 | विद्यापीठाने सन 2008 मध्ये करार पध्दतीने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्याबाबत उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती यांनी दिलेला अहवाल विचारार्थ सादर.<br>(टिपणी - महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन आदेश क्र.वायएमयु 2013 47) / 2013/विशि-1 दि.25/2/2014 च्या शासननिर्णयानुसार 71 पदे भरताना 17 करार पध्दतीने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना विद्यापीठाच्या नियमित सेवेत समाविष्ट करण्याबाबत सकारात्मक विचार करण्याच्या दृष्टिने उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती यांचा कायदेशीर सल्ला घ्यावा यांस मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती यांनी दिलेला अहवाल व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ सादर) (सहपत्र वेळेवर सादर करण्यात येईल)<br>**व्य.मं.ठराव: विद्यापीठाने सन 2008 मध्ये करार पध्दतीने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्याबाबत उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती यांनी दिलेला अहवाल मान्य करण्यात आला. अहवालात नमूद केल्याप्रमाणे सहाय्यकांची रिक्त पदे भरताना Regular procedure to be followed चा अवलंब करुन पदे भरावीत व त्यामध्ये 17 कर्मचाऱ्यांचा विचार करावा ही बाब महाराष्ट्र शासनास निदर्शनास आणून द्यावी व सदरील अहवाल प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्याकडे पाठवावा यांस मान्यता देण्यात आली.** |
| | 156.4.9 | करारावरील प्रशासकीय अधिकारी यांच्या पुर्ननियुक्तीबाबत विचारार्थ सादर.<br>(टिपणी - विद्यापीठाच्या वित्त विभागातील प्रशासकीय अधिकारी श्री ततार भालचंद्र विष्णू यांची कराराची मुदत 31 मे 2016 रोजी संपुष्टात आल्याने व त्यांच्या करारावरील सेवेला 2 वर्ष पूर्ण झालेले असल्यामुळे त्यांना मुदत वाढ देण्याविषयीचा विषय व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यासाठी मा. कुलगरुंना दि. 23.5.2016 रोजी टिपणी सादर केली असता मा कुलगुरुंनी विषय ठेवण्यास मान्यता दिलेली आहे. सबब श्री ततार भालचंद्र विष्णू, प्रशासकीय अधिकारी, वित्त विभाग यांना विद्यापीठाच्या परिनियम 11 (1993 of 2) मधील तरतूद क्र.5.4 अन्वये व्यवस्थापन मंडळाच्या पूर्वमान्यतेने १ वर्षासाठी मुदतवाढ देय आहे. सदर प्रस्ताव व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ) (सहपत्र E) |

| | | |
|---|---|---|
| | | **व्य.मं.ठराव: श्री ततार भालचंद्र विष्णू, प्रशासकीय अधिकारी, वित्त विभाग यांना विद्यापीठाच्या परिनियम 11 (1993 of 2) मधील तरतूद क्र.5.4 अन्वये १ वर्षासाठी मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.** |
| 156.5.0 | | **मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळचे विषय** |
| | 156.5.1 | Central Bank of India व Axis Bank या बँकामध्ये Online Payment Gateway खाते उघडण्यास व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ सादर.<br>(टिपणी - शैक्षणिक वर्ष 2015-16 पासून विद्यापीठाच्या सर्व शिक्षणक्रमांच्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व इतर शुल्क ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येत आहेत. हे शुल्क स्टेट बँक ऑफ इंडियाच्या पेमेंट गेटवे च्या माध्यमातून स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये स्वीकारले जाते. यासाठी विद्यापीठ, एम.के.सी.एल व स्टेट बँक ऑफ इंडिया असा संयुक्त करार करण्यात आलेला आहे. हा करार या वर्षी संपुष्टात येत असल्यामुळे Online Payment Gateway बँकेची/संस्थेची नियुक्ती करण्यासाठी ई टेंडर प्रसिध्द करण्यात आले होते. विद्यापीठाने सन 2016-17 या आर्थिक वर्षासाठी शुल्क जमा करण्यासाठी प्रसिध्द केलेल्या ई टेंडर प्रमाणे विहित प्रक्रिया राबविण्यात येऊन Central Bank of India व Axis Bank या दोन बँकाचे दर व सेवा यांचा विचार करता या दोन्ही बँकांची निवड करण्यात आलेली आहे. त्यासाठी या दोन्ही बँकामध्ये Online Payment Gateway खाते उघडण्यास विचारार्थ सादर)<br>**व्य.मं.ठराव: शैक्षणिक वर्ष सन 2016-17 साठी ऑनलाईन पेमेंट गेटवे खाते Central Bank of India व Axis Bank या बँकामध्ये उघडण्यास मान्यता देण्यात येऊन. Axis Bank मधील खाते हे Admission Fee चे transaction करण्यासाठीचे असून त्यामध्ये जमा होणारी रक्कम ताबडतोब विद्यापीठाच्या खात्यात वर्ग करण्यात यावी. तसेच या खात्यावर इतर कोणतेही व्यवहार करण्यात येऊ नयेत खात्यावर जमा होणारी रक्कम 48 तासात विद्यापीठाच्या खात्यात वर्ग करण्यात यावी यांस मान्यता देण्यात आली.** |
| | 156.5.2 | विश्वकोष मंडळातून प्राप्त होणाऱ्या रकमेचा वार्षिक खर्च आराखडा विचारार्थ सादर.<br>(टिपणी – विश्वकोष मंडळ वाई आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ यांच्यात शिक्षणशास्त्र या विषयाच्या ज्ञानमंडळ पालकत्वाबाबत दि.17 मे 2016 रोजी MoU करण्यात आले. विद्यापीठाला या प्रकल्प खर्चासाठी विश्वकोष मंडळ, वाई यांचेकडून रु.2,40,000/- प्राप्त होणार आहेत. विश्वकोष शिक्षणशास्त्र ज्ञानमंडळ वार्षिक खर्च आराखडा – (१) समन्वयक मानधन (15000*12) = रु.1,80,000/-, (२) ज्ञानमंडळ तज्ज्ञांच्या बैठका खर्च रु.21000/-, समन्वयक बैठका प्रवास व स्थानिक भत्ता खर्च रु.4000/-, (३) प्रशिक्षण कार्यशाळा खर्च रु.35000/-<br>**व्य.मं.ठराव: विश्वकोष मंडळाला सादर करावयाचा आराखड्यानुसार –**<br>**(१) समन्वयक मानधन (15000*12) = रु.1,80,000/-,**<br>**(२) ज्ञानमंडळ तज्ज्ञांच्या बैठका खर्च = रु.21000/-,**<br>**समन्वयक बैठका प्रवास व स्थानिक भत्ता खर्च = रु.4000/-,**<br>**(३) प्रशिक्षण कार्यशाळा खर्च = रु.35000/-**<br>**असे एकूण रु.2,40,000/- वार्षिक खर्च पाठविण्यास मान्यता देण्यात आली. विद्यापीठाने विश्वकोष शिक्षणशास्त्र ज्ञानमंडळाचे पालकत्व स्वीकारले असल्याने व त्यांच्याशी करार केला असल्याने शिक्षणशास्त्र ज्ञानमंडळाचे समन्वयक म्हणून डॉ.कविता साळुंके यांची नेमणूक केली आहे. त्यामुळे त्यांना देय असलेली दरमहा रु.15000/- समन्वयक मानधन घेण्यासही मान्यता देण्यात आली.** |
| | 156.5.3 | विश्वकोष खंड शिक्षणशास्त्र ज्ञानमंडळाच्या तज्ज्ञ सल्लागार मंडळ पदी नियुक्ती संदर्भातील दोन नावांना मान्यता मिळण्यासाठी विचारार्थ सादर<br>(टिपणी - शिक्षणशास्त्र ज्ञानमंडळात एकूण पाच सदस्य असणार आहेत. MoU तील पान क्र.2 वर ज्ञानमंडळाची कार्यपध्दती, कामकाज पार पडण्यासंबंधी अटी व शर्ती, या मुद्यांतर्गत उपमुद्दा क्र.2 नुसार शिक्षणशास्त्र ज्ञानमंडळासाठी तीन नावे विश्वकोष वाई मंडळ निश्चित करणार असून दोन नावे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामार्फत कळवायची आहेत.संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा हे या तज्ज्ञ सल्लागार मंडळ समितीचे पदसिध्द सदस्य असतील, याशिवाय (१) डॉ. अनंत जोशी, सेवानिवृत्त संचालक व प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक व (२) डॉ. ह.ना.जगताप, सेवानिवृत्त प्राचार्य, सोलापूर यांची नियुक्त करण्यास विचारार्थ सादर.<br>**व्य.मं.ठराव: विश्वकोष खंड शिक्षणशास्त्र ज्ञानमंडळाच्या तज्ज्ञ सल्लागार मंडळामध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामार्फत (१) डॉ. अनंत जोशी, सेवानिवृत्त संचालक व प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,** |

| | | |
|---|---|---|
| | | **नाशिक (२) डॉ. ह.ना.जगताप, सेवानिवृत्त प्राचार्य, सोलापूर यांची नावे पाठविण्यास मान्यता देण्यात आली.** |
| | 156.5.4 | विद्यापीठाच्या परिनियम 11 (2 of 1993) अन्वये निवड समितीचे गठण व त्यानुसार वित्त अधिकारी पदासाठी निवड समितीने दिलेला गोपनीय अहवाल विचारार्थ सादर.<br>व्य.मं.ठराव: **विद्यापीठाच्या परिनियम 11 (2 of 1993) अन्वये निवड समितीचे गठण करण्यास मान्यता देण्यात आली. व गठीत केलेल्या निवड समिती मार्फत वित्त अधिकारी पदासाठी प्राप्त झालेल्या अर्जामधून निवृत्त अधिकारी श्री. शिलानाथ एकनाथ जाधव, निवृत्त संचालक, लेखा व कोषागारे यांची दि. 1.7.2016 पासून दोन वर्ष कालावधीसाठी करार पध्दतीने एकत्रित वेतनावर (पे मायनस पेशन) याप्रमाणे व त्यात महाराष्ट्र शासनाच्या वेळोवेळी होणाऱ्या बदलानुसार वाढ देण्यास व निवड समितीने केलेल्या शिफारशीनुसार नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली.** |

सचिव
व्यवस्थापन मंडळ

अध्यक्ष
व्यवस्थापन मंडळ